# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

आपल्याला जी गोष्ट मिळते ती त्यावेळची आपली गरज असते, हा जीवनाचा नियम आहे. या क्षणी आपल्या जीवनात जे काही घडत आहे त्याची या क्षणाला आपल्याला गरज आहे, असा या रहस्यमय सूत्राचा आशय आहे. जीवनाचा हा नियम समजून घेतला तर आपण म्हणाल, "माझ्या प्रार्थनेनुसार माझ्या विकासासाठीच ही व्यवस्था केली गेली, अज्ञानामुळे माझी गरज काय आहे हे माझ्या लक्षात आले नव्हते." आपल्या अवतीभवती बघितले, तर या क्षणाला आपल्या बाबतीत काय काय घडत आहे ? जे काही घडत आहे, ते सर्व माझी या क्षणाची गरज आहे. हा विचार मनात आला की, आपला दृष्टिकोन बदलेल, याचा अर्थ असा नव्हे की, आपण परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करायचा नाही. जीवनाच्या या नियमाचे व्यवस्थित आकलन झाल्याबरोबर आपण वर्तमानाचा क्षणात स्वीकार करू शकतो.

शकुन-अपशकुन या गोष्टीचे मर्म लोकांच्या अजून लक्षात येत नाही. जे लोक मनाने अशक्त व कमकुवत असतात ते लोक फार संशयी असतात. हे लोक शकुन अपशकुनाच्या मागे लागतात. यासाठी ईश्वर उपासनेने तुम्ही तुमचे मन इतके मजबूत बनवा, मनाची शक्ती इतकी वाढवा की कोणताही अशुभ आकडा घाबरवू शकणार नाही.

---